शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २०४ । शनिवार, दि. १९ जुलै २०२५ । पाने -८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## उद्धव ठाकरे सत्ताधाऱ्यांवर बरसले


**मुंबई ।** विधानभवन परिसरात आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली होती, त्यानंतर दोन्ही आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनातच जोरदार हाणामारी झाली होती. त्याआधीही आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनमध्ये एकाला मारहाण केली होती. या सर्व प्रकरणावर ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाष्य केल. उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून सत्तेचा माज दिसत आहे, आपण आधी आमदाराची बॉक्सिंग पाहिली, काल विधिमंडळाच्या आवारात हाणामारी झाली.

## माजी मुख्यमंत्र्यांच्या मुलाला अटक

**रांची ।** दारू घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने अखेर कायद्याचा बडगा उचलला. ईडीने छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याच्यासह इतर आरोपींविरोधात भिलाई येथील चैतन्य बघेल यांच्या निवासस्थानी सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. ईडीच्या हाती काही महत्त्वपूर्ण कागदपत्रे लागली. त्यानंतर बराचवेळ चौकशी झाली. धाड टाकल्यानंतर चैतन्य याला अटक करण्यात आली. भूपेश बघेल यांच्या घरासह इतर अनेक ठिकाणी छापेमारी करण्यात आली.

## मराठी समजणार नसेल तर कानाखाली बसणारच!

## मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचा रोखठोक इशारा



**मुंबई ।** कानावर मराठी समजणार नसेल तर कानाखाली बसणारच असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. साधा छोटा प्रसंग होता. मोर्चाला जमलेले महाराष्ट्र सैनिक पाणी प्यायला गेले होते, त्या माणसाने विचारले कशासाठी मोर्चा काढता, मनसे सैनिकांनी सांगितले की, हिंदी सक्तीविरोधात मोर्चा सुरू आहे, त्यानंतर तो म्हणाला की इथे हिंदीच बोलतात. त्या माणसाच्या अरेरावीमुळे त्याच्या कानफटात बसली. मग व्यापाऱ्यांनी बंद पुकारला. तुमच्या कानाखाली मारली होती का? अजून नाही मारली, विषय समजून न घेता, काय झाले माहीत नसताना कोणत्या तरी राजकीय पक्षाच्या दबावाखाली येऊन बंद पुकारता, तुम्हाला काय वाटले मराठी व्यापारी नाही का इथे. दुकानं बंद करून किती दिवस राहणार आम्ही काही घेतले तर दुकाने सुरू राहतील, महाराष्ट्रात राहताय शांत पणे राहा, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

मीरा भाईंदरमध्ये मराठी भाषा बोलणार नाही, अशी मुजोरी दाखवणाऱ्यांना मनसेने चांगलाच दणका दिला, त्यानंतर मीरा भाईंदरमध्ये अमराठी व्यापाऱ्यांकडून मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चानंतर मनसेने देखील मीरा भाईंदरमध्ये मोर्चा काढला, या मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला, मोठ्या संख्येनं लोकं या मोर्चात सहभागी झाले होते. त्यानंतर आज मनसे प्रमुख राज ठाकरे यांची मीरा भाईंदर येथे सभा झाली

दरम्यान यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडत आहेत, इतर शाळात मराठी सक्तीची केली पाहिजे, ते सोडून हिंदी सक्तीची करत आहात. कोणाच्या दबावाखाली? कोण दबाव टाकतं तुमच्यावर? केंद्राचं हे धोरण पूर्वीपासूनचं आहे, असा हल्लाबोल यावेळी राज ठाकरे यांनी केला आहे.

## संपादकीय

### वाहतूक कोंडीचे अजब तर्कट

रस्त्यावरील वाहतूक कोंडी ही देशातील बहुसंख्य शहरांची नवी ओळख बनतेय. त्याची असंख्य कारणे सांगितली जातात. पण खुद्द मंत्री आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (न्हाई) यांनी त्याचे अजबच तर्कट मांडले. मंत्र्यांनी रस्त्यांवरील वाहनांच्या वाढत्या संख्येला दोष दिला तर न्हाईच्या सूत्रांनी लोक कामाशिवाय घरातून लवकर निघतातच कशाला असा उफराटा प्रश्न विचारला. महाराष्ट्रात सुमारे पाच कोटी वाहनांची नोंद झाल्याचा आकडा माध्यमात प्रसिद्ध झाला आहे. वास्तविक हे एकूणच सार्वत्रिक विकासाचे एक परिमाण आणि लोकांचा आर्थिक स्तर बदलत चालल्याचे निदर्शक मानले जाते. आता एवढी वाहने विना अडथळा धावण्यासाठी रस्तेही तेवढेच रुंद, प्रशस्त आणि अतिक्रमणमुक्त नकोत का? ते तसे बांधणे हे सरकारचे काम आहे. त्याऐवजी मंत्र्यांनी लोकांकडेच बोट दाखवले. राजकारणात प्रवेश केल्यावर गेलाबाजार कार्यकर्त्यांची सांपत्तिक स्थिती सुद्धा सामान्यांच्या डोळ्यात खुपावी एवढी बदलते पण लोकांनी मात्र वाहने विकत घेऊन त्यांच्या संपत्तीचे अप्रत्यक्ष प्रदर्शन करू नये असाही त्यांच्या वक्तव्याचा अर्थ निघू शकेल. भविष्याचा वेध घेऊन शहरांचा आकृतीबद्ध विकास सरकारने करणे अपेक्षित आहे. ते न्हाईचे काम. पण त्यांनी तर लोकांनाच बजावले. लोक विनाकारकच त्यांची वाहने रस्त्यावर आणतात असे न्हाईला वाटत असावे. त्याचे झाले असे, मध्यप्रदेशमधील इंदूर-देवास रस्ता नुकताच चाळीस तास जाम झाला होता. त्यात विविध कारणांमुळे तिघांचा मृत्यू झाला. त्यावरून न्यायालयात सुनावणी सुरु आहे. त्यावेळी न्हाईने उपरोक्त अजब कारण सांगितले. धन्य ते मंत्री आणि त्यांची सरकारी खाती. अरुंद रस्ते, त्यांची अपुरी क्षमता, पार्किंगची सुविधा नसणे, त्यामुळे

पान २ वर »

## कालच्या राड्यावरुन जनतेला वाटतेय

# सगळे आमदार माजलेत!

## मुख्यमंत्री फडणवीसांनी सभागृहात टोचले कान

**मुंबई ।** कालच्या घटनेने कोणा एका व्यक्तीची प्रतिष्ठा खराब झालेली नाही. येथे बसलेल्या प्रत्येकाची प्रतिष्ठा खराब झाली आहे. आज बाहेर ज्या काही शिव्या पडत आहेत. त्या एकट्या पडळकर किंवा यांच्या माणसाला पडत नाही. आपल्या सगळ्यांच्या नावे याठिकाणी बोलले जाते, हे सगळे आमदार माजले आहेत, असे म्हटले जात असल्याच्या कानपिचक्या मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिल्या. प्रत्येक गोष्टीचे राजकारण करून आपण राज्यातील जनतेला काय सांगणार आहोत, अशाप्रकारे समर्थन करणे योग्य होणार नसल्याचे म्हणत फडणवीसांनी सर्वच पक्षशंच्या बोलबच्चन आमदारांचे कान टोचले.

विधानभवनाच्या लॉबीत आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते भिडले. कायदेमंडळाची इभ्रत कुठे आणि कोणत्या खुटीला टांगली हे वेगळे सांगायची गरज नाही. कालच्या राड्यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली. दिल्लीपासून गल्लीपर्यंत त्याची चर्चा झाली. या प्रकाराच्या तीव्र प्रतिक्रिया समाज माध्यमातून उमटल्या. त्यावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मानिय सदस्यांना राज्यातील जनतेच्या मनात या घटनेच्या काय प्रतिक्रिया उमटल्या याची जाणीव करून दिली.



### अध्यक्षांनी घेतलेला निर्णय योग्य

काल जी मारामारी झाली, कुणी कोणासोबत कोण येतंय. याबाबत शिस्त असली पाहिजे सर्जेराव टकले यावर सहा गुन्हे आहेत. नितीन देशमुख वर ८ गुन्हे आहेत. अशी मंडळी येऊन मारामारी करतात, हे योग्य नाही. अध्यक्षांनी घेतलेला निर्णय योग्य. काहींनी चूक केली म्हणून सर्वांना शिक्षा नको. योग्य सुरक्षा व्यवस्था उभारा. कुठलाही अभ्यागत येऊ द्या. बिल्ल्याशिवाय तो दिसता कामा नये. एखाद्याने येऊन आतंकवादी घटना केली तर जबाबदार कोण. आमदार बिल्ला लावून येतात. पण अभ्यागतांच्या गळ्यात किमान एक ओळखपत्र असावे. नाहीतर सुरक्षा रक्षकांनी त्यास बाहेर काढावे. ज्या लोकांनी संधी मिळाली नाही म्हणून एजंट म्हटले, हस्तक म्हटले त्यांच्या वतीने मी दिलगिरी व्यक्त करतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### ...अन् मुख्यमंत्र्यांनी थेट सुनावले

ही विधानसभा आमदारांच्या किंवा मंत्र्यांच्या मालकीची नाही. महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या मालकीची आहे. समाजाला दिशा देणारे काम झाले पाहिजे. पण विचारातून चर्चेतून संदेश जाण्याऐवजी लाथा बुक्क्यांचा संदेश जात असेल तर सर्वांनी चिंतन करण्याची गरज आहे आपण दोघांना सांगितले व त्यांनी खेद व्यक्त केला. शब्दातून निघणारे विष हे नागाच्या विषापेक्षा अधिक विषारी असते, असे मुख्यमंत्र्यांनी सुनावले.आपण माणसं आहोत, राग अनावर होतो. पण आपला चर्चेचा स्थायीभाव हा डिस्कशन असावा कुणी मीडियासमोर अश्लील बोलत आहे. कुणी अध्यक्षांसमोर अध्यक्ष मॅनेज असल्याचे बोलत आहे. नियमाने याठिकाणी ४५ लक्षवेधी होण्याची गरज आहे. २०० लक्षवेधी घेत आहोत. अशावेळी जी भाषा आपण वापरतो, ती योग्य नाही. तिसरी भाषा कुठल्या वर्गात शिकायची, हे समिती ठरवेल. पण आपण त्रिसूत्री ठरवावी लागेल. संसदीय परंपरा, भाषेचे पालन व सातत्याने संवाद ठेवावा लागेल, याचे भान त्यांनी सदस्यांना करु



## इंडिया आघाडीला पहिला धक्का

### आम आदमी पार्टीने सोडली साथ

**नवी दिल्ली ।** लोकसभा निवडणुकीवेळी अबकी बार ४०० पारची गर्जना करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि एनडीएने निर्विवाद बहुमत मिळवण्यासाठी मोर्चेबांधणी केली होती. मात्र तेव्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी एकत्र येत स्थापन केलेल्या इंडिया आघाडीने भाजपाला २४० जागांवर तर एनडीएला ३०० जागांच्या आत रोखले होते. मात्र आता विरोधी पक्षांच्या या इंडिया आघाडीतील ऐक्य खिळखिळं होताना दिसत आहे. आज इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला असून, आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीसोबतचे आपले संबंध संपुष्टात आल्याचे जाहीर केले आहे. आम आदमी पक्षाने उचलेल्या या पावलामुळे संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विरोधी पक्षांचे ऐक्य कमकुवत होण्याची शक्यता आहे.

**ऐक्य कमकुवत होण्याची शक्यता**

लोकसभा निवडणूक आटोपल्यानंतर आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीपासून अंतर राखण्यास सुरुवात केली होती. तसेच दिल्ली विधानसभा निवडणुकीसह अनेक निवडणुका आपने स्वबळावर लढल्या होत्या. दरम्यान, आज आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीपासून फारकत घेण्याची औपचारिक घोषणा केली आहे. याबाबत आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह हे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, आमचा पक्ष इंडिया आघाडीने बोलावलेल्या बैठकीमध्ये सहभागी होणार नाही. आमचा पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांनी आप इंडिया आघाडीमधून बाहेर पडली असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही आम आदमी पक्ष संसदीय प्रश्नांवर तृणमूल काँग्रेस, डीएमके यांसारख्या विरोधी पक्षांसोबत समन्वय राखून त्यांना पाठिंबा देईल.





**मुंबई ।** जनसुरक्षा विधेयकावर स्वाक्षरी करु नये, सरकारने हे विधेयक आम्हाला विश्वासात घेतले नाही. असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना निवेदन देतांना विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, आमदार जयंत पाटील, आ.सतेज पाटील, आ. विजय वड्डेट्टीवार, आ.जितेंद्र आव्हाड, आ.अस्लम खान यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते

## जनसुरक्षा विधेयकावर स्वाक्षरी करु नका!

**मुंबई ।** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या विशेष जनसुरक्षा विधेयकावर स्वाक्षरी करू नये, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शुक्रवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे केली. जनसुरक्षा विधेयकास मान्यता न देता जनप्रक्षोभ विचारात घेऊन ते पुनर्विचारार्थ सरकारकडे परत पाठवावे, अशी विनंती महाविकास आघाडीने राज्यपालांना करण्यात आली. तर काँग्रेसतर्फे विशेष जनसुरक्षा विधेयकाबाबत नापसंती दर्शवणारे पत्र देण्यात आले.



**मुंबई ।** शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या निवास्थानी शुक्रवारी उत्तर महाराष्ट्रातील आमदारांची बैठक पार पडली .यावेळी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आ. सुहास कांदे, आ. चंद्रकांत पाटील, आ.मंजुळाताई गावित,आ.चंद्रकात रघुवंशी, आ.विठ्ठलराव लांघे-पाटील, आ.अमोल पाटील, आ. आमश्या पाडवी उपस्थित होते.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2500 |
| नवती (२) | : 2300 |

## मिश्कीली





## रॉबर्ट वाड्रांवर राजकीय सुडातून कारवाई - राहुल

**नवी दिल्ली ।** काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केंद्र सरकारवर तीव्र हल्लाबोल केला. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वाड्रा यांच्याविरोधात गुरुवारी दाखल केलेल्या आरोपपत्रानंतर राहुल गांधींनी प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधी म्हणाले, सरकार गेल्या १० वर्षांपासून माझ्या जिजाजींना त्रास देत आहे. ही चार्जशीट त्याच राजकीय सूडाच्या कारस्थानाचा भाग आहे. मी रॉबर्ट, प्रियंका आणि त्यांच्या मुलांच्या सोबत आहे.

त्यांना केवळ राजकीय हेतूने बदनामी आणि त्रास सहन करावा लागत आहे. पण मला खात्री आहे की ते धैर्याने आणि सन्मानाने या सगळ्याला सामोरे जातील. शेवटी सत्याचाच विजय होईल. फेब्रुवारी २००८ मध्ये रॉबर्ट वाड्रा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी या कंपनीने हरियाणातील गुरुग्रामजवळील शिकोहपूर गावात ३.५ एकर जमीन ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून ७.५ कोटी रुपयांना खरेदी केली. त्यावेळी हरियाणात काँग्रेसचे सरकार होते आणि भूपेंद्र सिंह हुड्डा मुख्यमंत्री होते.

## पद्मालय तलावासाठी एक हजार कोटी!

### जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची माहिती

**मुंबई ।** जिल्ह्यातील धरणगाव येथील पद्मालय साठवण तलावासाठी जलसंपदा विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून १०७२.४५ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.पद्मालय -२ उपसा सिंचन योजना.जि. जळगाव हा मध्यम प्रकल्प तापी पाटबंधारे विकास महामंडळ खानदेश या प्रदेशांतर्गत जळगाव जिल्ह्यातील तापी खो-यातील गिरणा उपखो-यात एरंडोल तालुक्यातील पद्मालय येथे आहे.

या प्रकल्पांतर्गत ७०.३६ दलघमी क्षमतेचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाव्दारे जळगांव जिल्हयामधील एरंडोल व धरणगाव तालुक्यातील ९००० हे क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.या प्रकल्पास सन १९९७-९८ चे दरसूचीवर आधारीत रू.९५.४४ कोटी एवढ्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तसेच रूपये ३७०.९४ कोटी (दरसूची २०१६-१७ मध्ये) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.



कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव, अन्वये प्रकल्पचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार या प्रकल्पाचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता छाननी अहवाल प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या विभागाच्या सहमतीने व्यय अग्रक्रम समितीच्या दि. २३/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केला असता त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. बांधकामाची सद्य:स्थिती, किंमत वाढीची कारणीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन साठवण तलाव पद्मालय-२ उपसा सिंचन योजनेच्या सन २०२३-२४ दरसूचीवर आधारित रुपये १०७२.४५ कोटी किंमतीच्या द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

## नारायणपूरमध्ये सहा नक्षलवादी ठार

**नारायणपूर ।** सुरक्षा कर्मचारी आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले. अबुझमद परिसरातील जंगलात नक्षलवाद्यांचा समावेश असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर शोध मोहीम सुरू करण्यात आली. चकमकीच्या ठिकाणाहून सहा माओवाद्यांचे मृतदेह, एसएलआर रायफल, इतर शस्त्रे, स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई अजूनही सुरू आहे. काही दिवसापूर्वी नक्षलवादी योगेंद्र पकडला झारखंडमध्ये सेंट्रल कोलफील्ड्स लिमिटेडच्या एका कर्मचाऱ्याकडून एक कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. या धमकीमागे भाकपाच्या कोयल-शंख झोन कमिटीचे नाव समोर आले होते. आता पोलिसांनी या प्रकरणात चार कुख्यात नक्षलवाद्यांना अटक केली आहे. या नक्षलवाद्यांमध्ये योगेंद्र गंझू उर्फ पवन गंझू या अत्यंत क्रूर नक्षलवाद्याचाही समावेश आहे. याने एका जवानाच्या हौतात्म्यानंतर त्याचं पोट फाडून बॉम्ब पेरण्याचं क्रूर कृत्य केलं होतं.